# पुणे महानगरपालिका

## * स्थायी समिती *

## कार्यपत्रिका क्रमांक २४

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १५/९/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### घनकचरा व्यवस्थापन आढावा

**विषय क्र. ४८१**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/८/२०२० ते दि.३१/८/२०२० अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/१९२० दि. ३/९/२०२० चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. ४८२**

मा.गणेश बिडकर, मा.राजेंद्र शिळीमकर व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि.४/९/२०२० चे पत्र.

पुणे शहरातील कोविड १९ महामारी सुरु असल्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य कार्यालयातील गोंधळाच्या परिस्थितीमुळे पुणे शहरातील नागरिकांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. पत्रकार, माजी महापौर यांच्या निधनानंतर पुणे शहरातील अपुऱ्या वैद्यकिय सुविधा, जंम्बो कोविड मधील अपुऱ्या सोयी सुविधा, अंशदायी योजनेतील सध्या उडालेला गोंधळ, रुग्णांना उपलब्ध बेडची माहितीतील अनियमितता याबाबत डॉ.अंजली साबणे यांचेशी मोबाईलवर संपर्क साधल्यास फोन न घेणे दोन दोन दिवस फोनला उत्तरही देत नाहीत त्या या पदाला न्याय देवू शकत नाहीत त्यांचे सभासद व अधिकारी यांचेशी असलेला संपर्क तुटलेला दिसत आहे याचे गंभीर परिणाम शहरातील नागरिकांना भागावे लागत आहेत व पुणे महानगरपालिकेची प्रतिमा नागरिकांमध्ये दिवसेंदिवस खराब होताना दिसत आहे.

तरी याबाबत त्यांची योग्य ती चौकशी करुन कडक कारवाई करण्यात यावी व त्यांच्याकडील कार्यभार काढून घेण्यात यावा व त्यांच्याकडील कार्यभार विभागून देण्यात यावा असे आदेश देण्यात यावेत.

**विषय क्र. ४८३**

मा.गणेश ढोरे यांचे दि.८/९/२०२० चे पत्र.

भौगोलिकदृष्टया राज्यातील सर्वात मोठी महानगरपालिका असलेल्या पुणे शहराचा संपूर्ण घनकचरा गेल्या अनेक वर्षापासून देवाची ऊरुळी, फुरसुंगी येथील कचरा डेपो येथे टाकला जात आहे. सदर कचरा डेपोपासून उद्भवलेल्या वायूप्रदुषण, वाहतुककोंडी, जलस्त्रोत प्रदूषण इ. समस्यांना स्थानिक ग्रामस्थांना सामोरे जावे लागत आहे. कचरा डेपोच्या अनुषंगाने स्थानिक ग्रामस्थांनी उग्र आंदोलने वेळोवेळी केलेली आहेत. सदर आंदोलनादरम्यान तत्कालिन मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांनी टप्प्याटप्प्याने कचरा डेपो पूर्णत: बंद करुन अन्यत्र कचरा डेपोकरिता पर्यायी जागा देण्याचे कबूल केले होते. सद्यस्थितीत मनपा प्रशासन राज्य शासनाने देवू केलेली जागा ताब्यात घेण्यासाठी कोणतेही ठोस प्रयत्न करत नाहीत. उलटप्रश्नी देवाची ऊरुळी, फुरसुंगी येथे नविन कचरा प्रक्रिया प्रकल्प उभा करुन पुढील १५ वर्षे चालविण्याचे नियोजन करत आहे.

देवाची ऊरुळी, फुरसुंगी येथे पुणे मनपा प्रशासन हे मे.भूमी ग्रीन एनर्जी ठेकेदारासोबत कचरा प्रकल्प सुरु करण्याचे नियोजन करत आहे. कचरा प्रक्रिया प्रकल्प या गोंडस नावाखाली मा.हरितलवाद व मा.महाराष्ट्र प्रदूषण मंडळ यांचे आदेशाचे उल्लंघन करीत दररोज शेकडो मे.टन कचरा डंपिंग करीत आहेत.

पुणे महानगरपालिकेने अनेक कचरा प्रक्रिया प्रकल्पांना मान्यता दिली. परंतु सदर प्रकल्प पूर्ण क्षमतेने न चालल्याने तसेच काही प्रकल्प न्याय प्रविष्ट असल्यामुळे प्रकल्प बंद आहेत या सर्वांची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर असून अधिकाऱ्यांना याबाबत विचारणा केली जात नाहीत. त्यामुळे कचरा हा प्रश्न गंभीर होत चालले आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी श्वेतपत्रिका निघणे गरजेचे असून त्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

पुणे मनपा घनकचरा व्यवस्थापन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मे.भूमी ग्रीन एनर्जी या ठेकेदाराशी संगनमत करुन सदोष निविदा प्रक्रियाद्वारे नियोजित प्रकल्पाचा कार्यादेश दिल्याचे समजते. सदर नियोजित प्रकल्पास देवाची ऊरुळी, फुरसुंगी येथील ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. वर्षानुवर्षे असलेल्या कचरा डेपोमुळे ऊरुळी देवाची, फुरसुंगी व लगतच्या गावातील जमीन, हवा व पाणी प्रदुषित झाल्याने नागरिकांच्या आरोग्याचा भीषण प्रश्न निर्माण झालेला आहे.

ऊरुळी देवाची, फुरसुंगी कचरा डेपो येथे कोणत्याही प्रकारचा कचरा प्रकल्प प्रशासनाने राबवू नये. सद्यस्थितीत सुरु केलेले कचरा प्रकल्प बंद करुन अन्यत्र राबवावे. सदर कचरा डेपो कायम स्वरुपी बंद करुन कचरा डेपोच्या जागी हॉस्पिटल, इ–लर्निंग स्कूल, मैदानासारख्या लोकपयोगी प्रयोजनाकरीता वापरावी.

**विषय क्र. ४८४**

मा.गणेश ढोरे यांचे दि.९/९/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कचरा प्रक्रिया प्रकल्प चालविणे बाबत विशेषतः मे भूमी ग्रीन एनर्जी या ठेकेदारी कंपनीकडून चालवित असलेले कचरा प्रकल्प सध्या भरपुर कारणांसाठी वादग्रस्त ठरलेले आहे. मे.भूमी ग्रीन एनर्जी कंपनी स्वतःच्या मालकीची मशिनरी वापरून ३०० ते ३५० प्रति मे. टन टीफींग फी घेऊन/ देखभाल दुरूस्ती दराने पुणे मनपाकडील अन्य कचरा प्रकल्प चालवित आहे.

मात्र देवाची उरुळी, फुरसुंगी येथे महानगरपालिकेची मशिनरी वापरून त्यांना तब्बल रू. ५०२/– प्रति मे. टन टीफींग फी/ देखभाल दुरूस्ती दर प्रतिवर्ष ८% दरवाढीने १५ वर्षांकरीता करण्याची निविदा प्रशासनाने अवैध पध्दतीने मान्य केलेली आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया सदोष पध्दतीने राबविलेली असून आक्षेपार्ह पध्दतीने नाममात्र दर तडजोडीने कमी करून प्रशासनाने शिफारस केल्याचे निदर्शनास येत आहे. पुणेकर नागरिकांचे कोटयावधी रूपयांचे वारेमाप उधळणी प्रसुत प्रकरणी होत आहे. स्थानिक देवाची उरुळी फुरसुंगी ग्रामस्थ यांचा विरोध लक्षात घेता याठिकाणी कचरा प्रकल्प चालवणे अडचणिचे आहे. आमचा या प्रकल्पास विरोध आहे.

सदर कारणास्तव मा.स्थायी समितीने यापूर्वी मान्य केलेला ठराव क्र. २३०३ दिनांक– २७/०२/२०२० रोजी मान्य केलेला ठराव प्रस्तुतच्या ठरावान्वये रद्द बादल करण्यात यावा.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. ४८५**

पुणे महानगरपालिका आरोग्य विभागात कामास व वेतनास असलेल्या श्री.सय्यद उस्मान सय्यद नजीर, हुद्दा – बिगारी यांच्या निलंबन कालावधीची पहिली सहामाही दि. १३/६/२०२० रोजी पूर्ण झालेली असून सदर बाब मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/२८१ दि.९/९/२०२० चे पत्र.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ४८६**

शिवाजीनगर–घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. ७ व १४ मध्ये विविध ठिकाणी पडीक हद्दीची ठेकेदारी पध्दतीने स्वच्छता करुन घेणे (सन २०१९–२०) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नंदिनी एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,७५,४७,०४०=२८ पेक्षा ६.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र. २/२७१ दि.७/९/२०२० चे पत्र.

१) सदर कामास ०१ एप्रिल २०२० ते ३१ मे २०२० अखेरपर्यंत मुदतवाढ मिळणेस

२) शिवाजीनगर–घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये झाडणकामाकरिता मजुर पुरविणे व त्यांच्याकडून काम करुन घेणेस, तसेच माहे ०१ एप्रिल २०२० ते ३१ मे २०२० अखेरपर्यंत ठेकेदार मे.नंदिनी एंटरप्रायजेस यांच्या मान्य दराने (६.९९% जास्त) बिल अदा करणेस र.रु. ५०,८५,७९७=३८ इतकी रक्कम अदा करणेस व त्यांचेसोबत वाढीव करार करणेस

**विषय क्र. ४८७**

शिवाजीनगर–घोलेरोड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत सन २०१९–२० मधील झाडण कामासाठी ठेकेदार मे.नंदिनी एंटरप्रायजेस यांना त्यांच्या जुन्या दराने (६.९९% जास्त) दि.१/६/२०२० ते दि.१५/७/२०२० पर्यंत कोरोना प्रादुर्भावामुळे अत्यावश्यक बाब म्हणून विनाखंडीत करुन घेतलेल्या कामाचे बिल सन २०२०–२१ च्या अंदाजपत्रकात

पृष्ठ क्रमांक ०८ अ.क्र. १ वर RE19A203D या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकामधून अदा करणे कामी पश्चात मान्यता घेणे आवश्यक असून मान्यता मिळणेस व सन २०२०–२१ मधील चालू निविदा क्र. १– Exeng-2020 शिवाजीनगर–घोलेरोड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत पडीक हद्दीची सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणे (सन २०२०–२१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,७३,९८,६७०/– पेक्षा २.४०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. २,८०,५६,२३८=०८ पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील नमुद नुसार कामगार दराबाबत शासनामार्फत वेळोवेळी होणारी वेतन वाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ सुत्रानुसार आदा करणेस/कपात करणेस व सदर काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने हे काम निविदा उघडल्याच्या नंतर म्हणजेच दि.१६/७/२०२० पासून काम करुन घेणेस व सर्वात कमी दर देणाऱ्या निविदाधारक यांचेशी करारनामा करणेस, केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/२७२ दि.७/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ४८८**

औंध–बाणेर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत आऊटसोर्सिंग पध्दतीने हद्दीतील झाडणकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.Nandini Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७,३४,९९,५०५=६९ पेक्षा १.४४% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७,४५,५७,८९८=५७ पैकी उपलब्ध तरतुद र.रु. ७,३४,९९,५०५=६९ पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने या कामास दि.१/६/२०२० पासून काम करवून घेणेस, बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/२७३ दि.७/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ४८९**

पुणे शहरातील निवासी मिळकतकरदाते व गवनि विभागाकडील सेवा शुल्क भरणाऱ्या कुटुंबांसाठी पंडित दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना राबविणे (टेंडर क्रमांक ८ सन २०२०–२१) कामी निविदा मागविल्या असता दोन निविदाधारकांनी निविदा सादर केलेली असून युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, स. नं. १०६/अे/८, शिवम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, शंकर मठाजवळ, पुणे सोलापुर रोड, हडपसर,पुणे –४११०२८ यांची निविदा सर्वात कमी रक्कमेची असल्याने त्यांचेकडून प्रतिकुटूंब प्रिमियम रक्कम रूपये ६२/–(१८% जीएसटी करासह वार्षिक ) x ७,४५,९०० निवासी मिळकतकरदाते व ग.व.नि. विभागाकडील सेवाशुल्क करदात्यांकरीता रक्कम रूपये ४,६२,४५,८००/–(अक्षरी रक्कम रूपये चार कोटी बासष्ट लाख पंचेचाळीस हजार आठशे फक्त) प्रिमिअम स्वरूपात अदा करणेस, खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर प्रिमियमची रक्कम खर्ची टाकणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२७६ दि.८/९/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०–२१

RE 17F 206

पडित दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना

मान्य तरतूद रक्कम रूपये ६,३०,००,००० पैकी र.रु.४,६२,४५,८००/–

**एकच टेंडर प्रकरणे**

**विषय क्र. ४९०**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मैदान शिवाजीनगर, बाणेर व पुणे मनपाचे इतर कोव्हिड रूग्णालय येथे लिक्विड ऑक्सिजन गॅस रिफिलिंग करणे कामी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मागविण्यात आली असता निविदाधारक टायओ निपॉन सॅनसो इंडिया प्रा.लि. यांची एकच निविदा आली असल्याने त्यांचेकडून प्रति क्युबिक मीटर रक्कम रूपये १७=३० पैसे प्रमाणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मैदान शिवाजीनगर,बाणेर व पुणे मनपाचे इतर कोव्हिड रूग्णालय येथील मागणीनुसार व आवश्यकतेनुसार रक्कम रूपये ६०,००,०००/– (अक्षरी रक्कम रूपये साठ लाख फक्त ) पर्यंत खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२७७ दि.८/९/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE 17F 257
COVID- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ४९१**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील हातगाडी वाल्यावंर कारवाई होते व त्यांना रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) मा.मुख्य सभा ठराव क्र. ७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये अतिक्रमण कारवाईत जप्त हातगाडी सोडणेकरिता मान्य झालेले रिमुव्हल चार्जेस रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) रद्द करुन त्याऐवजी रुपये १,०००/- (रुपये एक हजार) रिमुव्हल चार्जेस आकारुन हातगाडया सोडणेबाबत मा.सौ.सुजाता शेट्टी, मा.सौ.पल्लवी जावळे, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.वैशाली मराठे, मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.अविनाश बागवे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.रत्नप्रभा जगताप, मा.सौ.लक्ष्मी दुधाने, मा.सौ.दिपाली धुमाळ, मा.आबा बागुल, मा.सौ.हेमलता मगर, मा.सौ.सुमन पठारे, मा.वनराज आंदेकर, मा.अशोक कांबळे, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.पुजा कोद्रे, मा.प्रिया गदादे, मा.अजित दरेकर यांचे दि. २०/६/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३१३ दि. ४/७/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/अतिक्रमण/१९५ दि.३/८/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४९२**

सन २०१९-२० च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात CE22A680 ह्या अर्थशिर्षका अंतर्गत हज हाऊस बांधणे या कामाची र.रुपये ११७.५० लक्ष तरतूद प्रभाग क्र. २७ कोंढवा खुर्द स.नं. ४७/१ येथील पुणे मनपाच्या ताब्यात असलेल्या ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर हज हाऊसच्या कामासाठीची तरतूद त्याच जागेवर सिव्हीक कल्चरल ॲण्ड कम्युनिटी सेंटर बांधणे या सद्यस्थितीत चालू असलेल्या कामासाठी वापरणेस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/७३२ दि.१९/११/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४९३**

पुणे मनपा प्रशासनाने शहरातील बहुतांशी जाहिरातफल्कांना चुकीच्या पद्धतीन परवानगी व नुतनीकरणे दिलेले आहे. सदर परवानगी व नुतनीकरण दिलेले जाहिरातफलक प्रत्यक्षात जागेवर रस्त्यापासून १.५ मी. अंतराच्या आतमध्ये, जमिनीपासून ४० फुटांपेक्षा अधिक उंचीवर, नाले व नदीपात्रात तसेच पदपथ व रस्त्यावर देखील उभे केलेले आहेत. सदरील जाहिरातफलक हे प्रचलित कायद्याचा अनादर करणारे असून नागरिकांच्या जीवाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहेत. सदर बाब संबंधित परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा. उपायुक्त, मा. क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरिक्षक यांना ज्ञात असूनही प्रशासकीय निष्क्रियतेमुळे सदरील जाहिरातफलकांवर प्रत्यक्षात कारवाई होताना दिसत नाही. प्रशासनाने सदरील कायद्याचा अनादर करणा-या व धोकादायक जाहिरातफलकांवर १५ दिवसात कारवाई न केल्यास भविष्यात दुर्घटना घडून निष्पाप नागरिकांचा मृत्यु झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित जाहिरातदार, परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा.उपायुक्त, मा.क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरीक्षक यांचेवर निश्चित करण्यात यावी याबाबत मा.रफिक शेख व मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. २६/७/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ६३९ दि. ६/८/२०१९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी जा.क्र. मआ/परवाना व आकाशचिन्ह/६३८ दि.१४/१०/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४९४**

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्याबाबत मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६१ दि. २८/८/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/७८६ दि.६/१२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४९५**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४९६**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४९७**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुकारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४९८**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ४९९**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५००**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५०१**

जाहिरात फलक संदर्भातील सर्व कामे परवाना व आकाशचिन्ह विभागामार्फत करून परवानगी व कारवाईचे सर्व अधिकार परवाना व आकाशचिन्ह विभागाचे प्रमुखांना देण्याबाबत मा.सौ.छाया मारणे यांचे दि. २४/१२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १९४३ दि. ३१/१२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आकाशचिन्ह.पर./१०६० दि.७/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५०२**

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/खाजगी/सरकारी/निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम

यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलित दर (र.रु.) | प्रस्तावित दर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५०३**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेशशुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ट क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेश शुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ११/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**संकीर्ण**

**विषय क्र. ५०४**

१.बालेवाडी स.नं.२०,२१ व बाणेर स.नं.१०९ येथील इमारतीमध्ये पंचशील फांउडेशन यांचेकडून उभारण्यात येणा–या कोव्हिड केअर हॉस्पिटल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये भाकरे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांना कोविड–१९ आजाराचा प्रादुर्भाव असेपर्यंत पहिल्या टप्यात भाकरे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांनी दिलेल्या न्युनतम दराप्रमाणे १०० बेडस चालविण्यास देणेस व आवश्यकतेनुसार बेडस्च्या संख्येत वाढ करणेस

२.सदर बाबतचा खर्च आरोग्य कार्यालयाकडील अर्थशिर्षक सन २०२०–२१ ‘‘अंतर्गत अत्यावश्यक महसूली खर्च कामासाठी खर्च RE17 F 257 COVID - 19" या अर्थशिर्षकमधुन करणेस

मान्यता द्यावी अशी मा.स्थायी समिती ठराव क्र. ४४२ दि.१८/८/२०२० नुसार मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत पुणे शहरात कोव्हिड १९ आजाराचा प्रादुर्भाव असून प्रतिदिनी रुग्णांची संख्या वाढत आहे. अशा गंभीर परिस्थितीत कोव्हीड १९ आजाराने ग्रस्त रुग्णांना अत्यावश्यक वैदयकीय उपचार त्वरीत मिळणे आवश्यक आहे. यास्तव शहरातील रुग्णांसाठी आरोग्य सेवेअंतर्गत भविष्यात संपन्न होणारी मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर खाली नमुद बाबीस मान्यता द्यावी अशी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२६७ दि.३/९/२०२० चे पत्र.

१) बालेवाडी सर्व्हे नं.२०, २१ व बाणेर सर्व्हे नं.१०९ येथे उभारण्यात आलेले कोव्हिड केअर हॉस्पिटल भाकरे सुपरस्पेशालिटी यांस पुढील सहा महिन्यांसाठी चालविण्यास देणेस

२) वरील कामी येणारा खर्च आरोग्य खात्याकडील अर्थशिर्षक सन २०२०–२१ ‘‘अंतर्गत अत्यावश्यक महसूली खर्च कामासाठी खर्च RE17 F 257 COVID - 19" या अर्थशिर्षकावरील उपलब्ध रक्कमेतून संबंधित खर्च करणेस

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ४४२ दि.१८/८/२०२० चा दुरुस्त करण्यात येत आहे.

**विषय क्र. ५०५**

पुणे महानगरपालिका कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत कोविड–१९ अंतर्गत ट्रिनिटी कॉलेज येवलेवाडी येथे मोकळया जागेत अँटीजेन सेंटर उभे करणे आणि ट्रिनिटी कॉलेज वसतीगृह येथे कोविड सेंटरची क्षमता वाढविणे व तदनुषंगिक कामे करणे हे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार मे.समर्थ कन्स्ट्रक्शन या एजन्सीकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबी मा.स्थायी समितीमार्फत

मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/२६९ दि.४/९/२०२० चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत कोविड-१९ अंतर्गत ट्रिनिटी कॉलेज येवलेवाडी येथे मोकळया जागेत अँटीजेन सेंटर उभे करणे आणि ट्रिनिटी कॉलेज वसतीगृह येथे कोविड सेंटरची क्षमता वाढविणे व तदनुषंगिक कामे करणे

सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी - RE17F 257

Covid – 19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

२) मे.समर्थ कन्स्ट्रक्शन यांचेशी करार करणेस

३) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार सदरचे काम करणेस

**विषय क्र. ५०६**

पुणे महानगरपालिकेचे Covid care center (CCC) येथील कामकाजाकरिता एकवट वेतनावर, ९० दिवस कालावधीसाठी, तात्पुरत्या स्वरुपात "डाटा एन्ट्री ऑपरेटर" नियुक्त करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/२७० दि.४/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५०७**

कोरोना कोव्हिड -19 रूग्णांकरीता Remdesivir 100mg ची खरेदी लक्ष्मी मेडिकल्स यांचेकडून र.रू. १६,९६,२४०/- (अक्षरी र.रू.सोळा लाख शहानव हजार दोनशे चाळीस फक्त) व Tab Favipiravir 200mg ची खरेदी ग्लेनमार्क कंपनी यांचेकडून र.रू.९,९९,६००/- (अक्षरी र.रू.नउ लाख नव्यानव हजार सहाशे फक्त) Injection,Remdesivir 100mg ची खरेदी M/S Mylan laboratories limited या कंपनी यांचेकडून र.रू. १६,९६,२४०/- (अक्षरी र.रू.सोळा लाख शहानव हजार दोनशे चाळीस फक्त) असे इंजेक्शन व टॅबलेट र.रू. ४३,९२,०८० /-(अक्षरी र.रू.त्रेचाळीस लाख ब्यॅनव हजार ऐंशी फक्त)पर्यंत शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार खरेदी करणे त्यांच्याशी आवश्यक तो करारनामा करणेस व खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांची बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/एचओ/२७४ दि.७/९/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१

RE 17F 257

COVID- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

**विषय क्र. ५०८**

आरोग्य खात्याकडे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी करार पद्धतीने एकवट वेतनावर विविध संवर्गातील पदांच्या सेवांना मुदत वाढ देणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/२७५ दि.८/९/२०२० चे पत्र.

१. मा.स्थायी समिती ठराव क्र. २२ दि.१६/४/२०२० अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेचे अनुषंगाने सेवा घेण्यात येत असलेल्या एकुण ५८ पदांवरील अधिकारी व सेवकांना दि.१२/०९/२०२० रोजी नंतर व दि.२७/१०/२०२० रोजी नंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन performance reports च्या आधारे पुढील सहा महिन्यांकरिता घेणेस.
२. सदर सेवक हे कोरोना विषाणू (कोविड १९) महामारी च्या परिस्थिती मध्ये काम करत असल्याने, आरोग्य विभागाने वेळोवेळी कोरोना विषाणू (कोविड १९) महामारी परिस्थिती मध्ये विविध जाहिराती मध्ये नमूद वेतनानुसार, सदर सेवकांना अदा करण्यात येणाऱ्या वेतनात वाढ करून नियुक्त करण्यात येणाऱ्या सेवकांना सुधारित वेतन अदा करणेस.
३. सदर पदावरील सेवांकरीता संबंधित सेवकांकडून नव्याने अनामत रक्कम न घेता पूर्वीचीच अनामत रक्कम ग्राह्य धरणेस.
४. आज्ञापत्रक आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने निर्गमित करणेस.

**विषय क्र. ५०९**

शिक्षण विभागाकडील शिक्षक कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य समिती सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शिविप्रा/२७८ दि.८/९/२०२० चे पत्र.

१) शिक्षण विभाग (प्राथ.) पुणे महापालिकेकडील शिक्षक कर्मचा-यांना ७ वा वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागु करण्याबाबतचा प्रस्ताव मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र. ५ नुसार ७ व्या वेतन आयोगातील कोणती वेतनश्रेणी समकक्ष असेल याबाबतचा प्रस्ताव आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडे पाठविणेस.

२) संबंधीत सर्व कार्यरत असलेल्या शिक्षक कर्मचायांना ७ वा वेतनआयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी मनपा सेवकांप्रमाणे दि.०१/०१/२०१६ पासून लागू करण्यास प्रत्यक्ष वेतन मनपा सेवकांप्रमाणे दि. ०१/०४/२०२० पासून देण्यास व दि.०१/०१/२०१६ ते ३१/०३/२०२० अखेर पर्यंतचा वेतन आयोगाचा फरक प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर सातव्या वेतन आयोगाच्या फरकापोटी अग्रिमाची रक्कम प्रथम हस्यामधून समायोजित करुन उर्वरित रक्कम पुढील ५ वर्षात समान हस्यात रोखीने अदा करणेस.

३) दि.०१/०१/२०१६ ते ३१/०३/२०२० या कालावधीत सेवानिवृत्त अथवा कोणत्याही कारणास्तव सेवा समाप्त झाल्या असतील अशा कर्मचा-यांना दि. ०१/०१/२०१६ ते सेवेत असलेल्या दिनांकापर्यंतचा कालावधीतील वेतनाची थकबाकी अनुज्ञेय असल्यास सदर समान ५ हस्यात रोखीने अदा करणेस.

४) सेवानिवृत्त आणि कुटुंब वेतनधारक यांच्या निवृत्ती वेतनात दि. ०१/०१/२०१६पासून सुधारणा करणेस तसेच सुधारीत वेतन संरचनेत निवृत्तीवेतनाचा प्रत्यक्ष लाभ दि.०१/०४/२०२० पासून अदा करणेस व दि. ०१/०१/२०१६ ते दि. ३१/०३/२०२० या कालावधीतील देय होणाऱ्या वेतनाची थकबाकी अनुज्ञेय असल्यास सदर समान ५ हस्यात रोखीने अदा करणेस.

**विषय क्र. ५१०**

पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, तंत्र शाळा कडील शिक्षकांना सुधारित ७ वा वेतन आयोग लागू करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य समिती सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शि.वि.माध्य.व तांत्रिक/२७९ दि.८/९/२०२० चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, तंत्र शाळा कडील शिक्षक, सेवा निवृत्त आणि कुटुंब निवृत्ती वेतनधारक शिक्षकांना सुधारित सातवा वेतन आयोग शासन निर्णयातील वेतनश्रेणीप्रमाणे दि.०१/०१/२०१६ पासून लागू करणेस व प्रत्यक्ष वेतन त्याप्रमाणे एप्रिल२०२० पासून अदा करणेस .....

२) पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा , तंत्र शाळा कडील शिक्षकांना सातवा वेतन आयोगाच्या फरकापोटी अग्रीमाची रक्कम प्रथम हप्त्यातून समायोजित करून उर्वरित रक्कम पुढील ५ समान हप्त्यात पुणे महानगरपालिका सेवकाप्रमाणे रोखीने अदा करणेस ...

३) कार्यरत असलेल्या शिक्षक कर्मचा-यांचा दि.१/१/२०१६ ते ३१/०३/२०२० अखेर पर्यंतचा वेतन आयोगाचा पुढील ५ समान हप्त्यात पुणे महानगरपालिका सेवकाप्रमाणे रोखीने अदा करणेस .....

४) दि.१/१/२०१६ ते ३१/०३/२०२० या कालावधीत पुणे महानगरपालिका सेवकाप्रमाणे सेवानिवृत्त अथवा कोणत्याही कारणास्तव सेवा समाप्त झाल्या असतील अशा कर्मचा-यांना दि. १/१/२०१६ ते सेवेत असलेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील वेतनाची थकबाकी अनुदेय असल्यास सदर समान ५ हप्त्यात रोखीने अदा करणेस.

५) सध्या कार्यरत शिक्षक कर्मचारी, सेवा निवृत्त आणि कुटुंब निवृत्ती वेतनधारक यांना पुणे महानगरपालिका सेवकाप्रमाणे एप्रिल २०२० पासूनचा वेतन आयोगाचा फरक रोख अदा करणेस ......

६) सदर प्रस्ताव अंतीम मंजुरीसाठी मे.राज्यशासनाकडे पाठविणेस....

विषय क्र. ५११

पुणे महानगरपालिका परिमंडळ क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत सिंहगड इन्स्टीट्युटचे मुलांचे वसतीगृह इमारत रायगड, पन्हाळा व मुलींचे वसतीगृह ए,बी,सी, गावडे शाळा, पोकळे शाळा येथे स्थापित केलेल्या आयसोलेशन/ क्वारंटाईन /CCC केंद्रासाठी दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी व दुपारी चहा, नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण, लहान मुलांसाठी दुध व बिस्कीटे , गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे १)मे.मॉर्डन केटरर्स, २) मे.कॅफे साईलिला, या एजन्सीकडुन त्यांचे माहे एप्रिल २०२० च्या दराने आणि ३) मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन या एजन्सीकडुन दि.१२/०४/२०२० पासुन आणि स्थापत्य विषयक कामे मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने करुन घेतलेबाबत व सदर बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३)(क) अन्वये करणेत आल्याने खालील बाबींची माहिती मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा पुणे म.न.पा.यांच्याकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.३/२८० दि.८/९/२०२० चे पत्र.

१) मे.एस.पी.कन्स्ट्रक्शन यांचे परिशिष्ट(अ)प्रमाणे दि.०१/०५/२०२० ते दि.३०/०५/२०२० अखेर सिंधुदूर्ग इमारतीची केलेली साफसफाई व कोरोंटाईन सेंटर येथे पुरविलेले मजुर यांचा एकुण खर्च र.रु.२,०१,००४=६२ हा १२% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.२,२५,१२५=१७ त्यांना आदा करणेस.
२) मॉडर्न केटरर्स यांचे परिशिष्ट(ब) प्रमाणे दि.०१/०५/२०२० ते दि.३०/०५/२०२० अखेर गलर्स हॉस्टेलचे ए-पायास्वामी, बी-यमुना व सी-गोदावरी या इमारतीमधील रुग्णांना पुरविलेले २ वेळचे जेवणाचा खर्च र.रु.२१,७४,६२५/- हा १०% जी.एस.टी.सह र.रु.२३,९२,०८७=५० एवढा त्यांना आदा करणेस.
३) मे.कॅफे साईलिला यांचे परिशिष्ट(क)प्रमाणे दि.०१/०५/२०२० ते दि.३०/०५/२०२० अखेर सकाळचा चहा, दुध व नाष्टा, दुपारचा चहा, दुध व बिस्कीट व आवश्यकतेनुसार पिण्याचे पाणी बिस्लेरी पाणी बॉटल इ. पुरविलेल्या पदार्थाचा खर्च र.रु.१३,१७,६०५/- हा १०% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.१४,४९,३६५=५० आदा करणेस.
४) मे.कॅफे साईलिला यांचे परिशिष्ट(इ)प्रमाणे दि.०१/०५/२०२० ते दि.३०/०५/२०२० अखेर सकाळचा व दुपारचा सिंहगड कॉलेज येथील कोरोना केअर सेंटरवर व अवेटेड सेंटरवर काम करणारे अधिकारी, अभियंते, डॉक्टर्स, नर्स, सुरक्षा रक्षक, वाहन चालक, सफाई कर्मचारी यांना पुरविलेल्या चहा/कॉफी यांचा खर्च र.रु.१,१६,९२०/- १०% जी.एस.टी. सह एकुण खर्च र.रु.१,२८,६१२/- त्यांना आदा करणेस.
५) मे.कॅफे साईलिला यांचे परिशिष्ट(ड)प्रमाणे दि.०१/०५/२०२० ते दि.३०/०५/२०२० अखेर रायगड, पन्हाळा, धायरीतील पोकळे शाळा व पर्वती जनता वसाहत येथील गावडे शाळा येथे २ वेळेचे पुरविलेले जेवणाचा खर्च र.रु.१५,५८,६६४/- हा १०% जी.एस.टी.सह एकुण खर्च र.रु.१७,१४,५३०/- त्यांना आदा करणेस.
६) वरील अ.क्र.१,२,३,४ व ५ प्रमाणे होणारा खर्च खालील अर्थशिर्षकावर करणेस.
   अर्थशिर्षक :- सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक
   Covid 19 अंतर्गत महसुली कामांसाठी (खर्च)
   RE17F257
७) वरील अ.क्र.१ ते ५ प्रमाणे माहे मे २०२० मधील झालेल्या कामांची कार्यवाही व अमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम क्र.६७(३)(क) अन्वये सदर ठिकाणचे काम संपेपर्यंत करुन घेण्यास.

शिवाजी दौंडकर
प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.